दिल ने फिर याद किया...

चित्रपट बोलू लागला आणि पडद्यावर संगीताचेही सूर उमटले. या सुरावटीत कित्येक संगीतकारांचे ताल, लय नि गायकांचे स्वर मिसळले होते. या सुरेल संगीताने एकेकाळी पडदा अक्षरशः गाजवला. नव्या युगात, नव्या शतकात, नव्हे नव्या सहस्रकात पदार्पण करताना त्याच सुवर्ण कारकीर्दीच्या मनात घोळवलेल्या या स्मृती...

□ अजित पोपट


सी. रामचंद्र


रवी


आर. डी. बर्मन


मदन मोहन


शंकर-जयकिशन

फिल्मिलेनियम २०००

१९३५ची गोष्ट. दिग्दर्शक नितिन बोस यांच्या फलद्रूप डोक्यात एक कल्पना आली. चित्रपट होता *धूपछांव* व गायक-संगीतकार होते पंकज मलिक. पंकजदा आपल्या घरी ग्रामोफोनच्या रेकॉर्डसह गात असताना नितिन बोसनी पाह्यले आणि नितिन बोसना पार्श्वगायनाची कल्पना सुचली.

यापूर्वी देखणे कलाकार पडद्यावर दिसत पण संगीताशी छत्तीसचा आकडा असल्यासारखे नायक-नायिकाही चित्रपटात गात आणि या कलाकारांना गाताना पुन्हा रेकॉर्ड करण्याची नौबत येत असे. नायक-नायिका झाडाखाली उभे राहून गात असले तर संगीतकारांना वाद्ये घेऊन झाडावर मचाण बांधून बसावे लागे. त्याकाळात रेकॉर्डिंग मशीन्सही कशा? मेणाच्या थाळ्या गरम झाल्या की गाणे म्हणायला घ्यायचे. बऱ्याचदा कलाकार व वादकांचा मेळ जुळे जुळेपर्यंत ही थाळी गार व्हायची की पुन्हा थाळी गरम करण्याचा उद्योग सुरू.

पार्श्वगायनाचा शोध लागल्यावर ही डोकेफोड संपली. रेकॉर्ड आधी करायची आणि नंतर हीरो-हीरॉईन्स चित्रीकरण करताना ती वाजवायची.

स्वरकिन्नरी लता मंगेशकर यांनीही कबूल केले की, माझ्या गाण्यातील काही रहस्ये मी अनिलदांकडूनच शिकले. १९४८ साली लता प्रथमच गर्ल्सस्कूलसाठी गायली. त्या चित्रपटात अनिल विश्वास व सी. रामचंद्र यांचे संगीत होते. यानंतर लताने इतिहासच घडवला.



वसंत देसाई

हा प्रयोग कलकत्त्यात नितिन बोस, पंकज मलिक व रामचंद्र बोराल यांनी केला तोच प्रयोग मुंबईत एका महिलेनेही केला. बॉम्बे टॉकीजच्या *अछूतकन्या* चित्रपटासाठी सरस्वतीदेवींनी संगीत दिले. त्यांनीच मुंबईत पार्श्वगायनाचा यशस्वी प्रयोग केला. अशोककुमार व देविकाराणी यांना चमकवणाऱ्या या चित्रपटात 'मैं बन की चिडिया बनमें बन बन बोलूं रें...' सारखे हिट गाणे त्यात होते. या प्रयोगाने हिंदी चित्रपट संगीतात एक नवे युग निर्माण केले.

पहिला बोलपट अरदेसर ईरानींचा *आलमआरा* आला १९३१ साली आणि पार्श्वगायनाचा शोध लागला १९३५ साली. चित्रपट सृजनकलेत एक सुवर्णप्रकरण लिहिले गेले. १९३५ पासून ते २००० वर्ष म्हणजे सुमारे पासष्ट वर्षांच्या काळात चित्रपटनिर्मिती व चित्रपट संगीताने मोठी मजल मारली. पार्श्वगायनाच्या सुरूवातीच्या काळात बालपणी संगीत न शिकलेल्या कलाकारांना संगीताची तालीम घ्यावी लागत असे. पण आज पडद्यावरच्या कलाकाराला गाता येत नसले तरी त्याला गाणे उत्तम येते असा भास निर्माण करता येतो. इतकेच कशाला पार्श्वगायन करताना एखाद्या गायक-गायिकेची काही चूक झाली तर संगणकाच्या मदतीने ती चूक सुधारताही येते. अलिकडचाच एक किस्सा... आशा भोसलेंनी स्वतःच तो सांगितला. लंडनच्या एका स्टुडियोत ६० ट्रॅकच्या अत्याधुनिक संगणकीय रेकॉर्डिंग मशीनवर गीते उतरवली जात होती. आशाबाई गात होत्या. पण गाण्यात त्यांची काहीतरी चूक झाली हे त्यांना कळले तेव्हा त्यांनी गाणे पुन्हा रेकॉर्ड करायला सांगितले. मात्र ध्वनिसंयोजकांनी त्याला नकार दिला. कुठल्या ठिकाणी तुम्ही गाणे चुकलात सांगा आपण ती चूक सुधारू. ध्वनिसंयोजकांनी ती चूक तशी सुधारूनही दाखवली आणि आशाबाई थक्क झाल्या.


सांगायचा उद्देश एवढाच की गेल्या सहा साडे सहा दशकात चित्रपट संगीताच्या गीतगंगेत कितीतरी प्रवाह येऊन गेले. गायक-संगीतकारांच्या चार पिढ्या आल्या.

नव्या शतकात पाऊल टाकताना इथल्या सीमाचिन्हांचीच दखल आपण घेऊ शकू. प्रत्येकाची रूची व आवडीची गाणी भिन्न असल्याने लोकांच्या दृष्टीने आवडते गीत वा गायक यात कदाचित येणारही नाहीत पण चित्रपटात एक वेगळा प्रवाह आणणाऱ्या काही गोष्टींची आठवण आम्ही आवर्जून केलीय.

१९३० आणि त्यानंतरचा काळ १९४०चे दशक चित्रपट संगीत व पार्श्वगायनाचे बालपणच म्हणायला हवे. त्याकाळात वादक खूप कमी होते. साऊंडप्रूफ रेकॉर्डिंग स्टुडियो नव्हते. गायक व वादकांमध्ये एकच मायक्रोफोन असायचा. तरीही त्याकाळात गायलेली नि



सलील चौधरी



कल्याणजी आनंदजी

संगीतबद्ध झालेली गाणी आजही आपल्याला ऐकायला मिळतात.

१९३०च्या दशकातील संगीतकार गायकांमध्ये दोन-तीन नावे विशेष उल्लेखनीय आहेत. रामचंद (आर. सी.) बोराल, पंकज मलिक व ज्ञान घोष. त्यात पंकज मलिक यांचे योगदान गुणवत्ता व विपुलता या दोन्ही दृष्टीने महत्त्वाचे. पंकज मलिक उत्तम अभिनेते होते, उमदे गायक होते व उच्च कोटीचे संगीतकार होते. पूर्व-पश्चिमेचे शास्त्रीय संगीत, रवींद्र संगीत व लोकसंगीत याचे गाढे अभ्यासक होते. म्हणूनच त्यांनी गायलेली वा स्वरबद्ध केलेली गीते सदाबहार बनली. *कपाल कुंडला* सारख्या चित्रपटात पंकजदांबरोबर अमर गायक कुंदनलाल सायगलही पाह्यला व ऐकायला मिळाले. सायगल सहज अभिनयाचे प्रथम पुरस्कर्ते एवढेच नव्हे तर उत्तम गायकही. पंकजदा व सायगल यांची गीते आजही लोकप्रिय आहेत. गेल्या दशकात एचएमव्हीने सायगल यांच्या कॅसेटस्‌चे संच तीन ते चार वेळा बाजारात आणले आणि ते संच हातोहात बाजारातून खपले गेले. शास्त्रीय संगीताचे उस्ताद जे घराणेदार बंदिश देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवू शकत नव्हते ते राग भैरवीतली ठुमरी... 'बाबूल मोरा नैयर छूटे री जाय...' रातोरात घरोघरी पोहोचवली गेली. हे गाणे त्यानंतर डझनावारी लोकांनी गायले पण सामान्य माणसासाठी हे गाणे म्हणजे सायगल. मात्र या गाण्याच्या तर्जचे यश मिळाले रामचंद बोराल यांना.

सायगल यांची दुबळी नक्कल म्हणून प्रवेश करून यश व संपत्ती मिळवलेले दुसरे अभिनेते होते सुरेंद्रनाथ. त्यांच्या आवाजाची उंची खूपच मर्यादित होती. सुरेंद्रनाथनी हीरो म्हणून जे काही थोडे चित्रपट केले व गीते गायली त्यात यादगार गीत ठरले *अनमोल घडी*मधले 'आवाज दे कहाँ है...' मलिका-ए-तरन्नूम नूरजहाँबरोबर सुरेंद्रनाथनी हे गीत गायलेले स्वातंत्र्योत्तर काळानंतर हेच सुरेंद्र चरित्र अभिनेते म्हणून चमकले.

१९४०च्या दशकात तीन मोठे संगीतकार चित्रसृष्टीत आले ते होते, अनिल विश्वास, गुलाम हैदर व सज्जाद हुसेन. या तीन नावांशिवाय चित्रपट संगीताचा इतिहास अपूरा राहील.

स्वरकिन्नरी लता मंगेशकर यांनीही कबूल केले की, माझ्या गाण्यातील काही रहस्ये मी अनिलदांकडूनच शिकले.

१९४८ साली लता प्रथमच गर्ल्सस्कूलसाठी गायली. त्या चित्रपटात अनिल विश्वास व सी. रामचंद्र यांचे संगीत होते. यानंतर लताने इतिहासच घडवला. असाच इतिहास 'एक दिल का लगाना बाकी था सो दिल भी लगा के देख लिया' (*अनोखा प्यार*) द्वारा तलत मेहमूद व अनिल विश्वास यांनी एक इतिहास रचला.

अनिल विश्वास यांच्या समकालिनांमध्ये गुलाम हैदर, श्याम सुंदर व सज्जाद हुसेन यांची नावेही महत्त्वाची आहेत. या संगीतकारांनी हाताच्या बोटावर मोजता येतील एवढ्याच चित्रपटांना संगीत दिले तरी त्यांचा उल्लेख मैलाचा दगड म्हणून करता येईल, अशी कामगिरी त्यांनी निश्चितच केलीय. सुरूवातीची दोन दशके चित्रपटसंगीत घडवायला उपकारक ठरली मात्र चित्रपट संगीताचा खऱ्या अर्थाने सुवर्णकाळ ठरला तो १९५० ते १९७०. यात देशाला मिळालेले स्वातंत्र्य हे प्रमुख कारण होते. चित्रसृष्टीला जी नवी चैतन्यपूर्ण पिढी मिळाली ती काही नवं करून दाखवण्याच्या इराद्याने झपाटलेली होती. प्रत्येक संगीतकाराची स्वतःची वेगळी ओळख होती. प्रत्येकाची अनोखी शैली होती. शुद्ध शास्त्रीय संगीतावर आधारित संगीतापासून ते सामान्य माणसाला कळेल अशा बंदिशा देणारे संगीतकार या काळात येऊन गेले.

अत्यंत नाजूक संवेदना हृदयस्पर्शी तर्जद्वारा रूजू करणारे गजलांचे बादशाह मदन मोहन, प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय संगीताचा योग्य वापर करणारे सी. रामचंद्र, ईशान्य भारतातील संगीताला केंद्रस्थानी ठेवून पहिल्या पावसाप्रमाणे धरतीचा सुगंध पसरवणारे संगीत देणारे एस डी बर्मन, गुलाम हैदर यांच्या शैलीला आपल्या आगळ्या लयीत सादर करणारे ओ. पी. नय्यर, चित्रपट शौकिनांची नाळ पारखून

तीनशे चित्रपटांना संगीत देणारे लोकप्रिय संगीतकार कल्याणजी-आनंदजी आणि ज्यांना उचलेगिरीचे उस्ताद म्हणून पहिल्यांदा संबोधले गेले तरी स्वतःची एक मौलिक शैली प्रदान करणारे आर. डी. बर्मन.

पन्नास वर्षांच्या कारकीर्दीत सत्तर चित्रपटांचे संगीत देणाऱ्या संगीतकार नौशाद यांनी उस्ताद झंडे खां यांचे पियानोवादक म्हणून कारकीर्द सुरू केली. शिक्षण जेमतेम लिहिता-वाचता येईल एवढेच झालेले तरी संगीताच्या क्षेत्रात तानसेन म्हणून सिद्धी मिळवली. भारतीय चित्रपट संगीताला प्रथमच आध्यात्मिक उंची मिळवून दिली ती नौशाद यांनी. आज खुशीचे नि दर्दभरे असे संगीताचे दोन भाग केले जातात. हे दोन्ही प्रकार नौशाद यांनी आरंभले. *बाबूल* (१९५०) चित्रपटाचे शीर्षकगीत 'छोड बाबूल का घर आज पी के नगर मोहें जाना पडा...' गाण्याला लयवाद्याशिवाय करूण स्वरात रूजू करून दुःखी गाण्यांचा आरंभ नौशादनी केला. चित्रपटात वायब्रोफोन ढोलक ही वाद्ये त्यांनी आणली. हीरोला पियानोवर गाताना दाखवण्याची सुरूवात त्यांनीच केली. महंमद रफी यांच्यासारखा गायक हिंदी चित्रपटाला मिळाला तो नौशादजींमुळे. त्यांचे सगळेच चित्रपट संगीतदृष्ट्या हिट होते. *अंदाज*, *मदर इंडिया*, *मुगल-ए-आझम*, *बैजू बावरा*, *गंगा जमना*, *मेरे मेहबूब* सारखी कितीतरी संगीतदृष्ट्या हिट चित्रपटांची नावे त्यांच्या खाती आहेत. शास्त्रीय संगीतातील धुरंधरांना चित्रपटात गायला लावण्याची सुरूवात नौशादनी केली. उस्ताद अमीर खां (*शबाब*, *बैजू बावरा*), उस्ताद बडे गुलामअली खां (*मुगल-ए-आझम*), डी.व्ही. पलुस्कर (*बैजू बावरा*) यांना चित्रपटात गायला आणले ते नौशादनीच. मात्र हे सगळे दिग्गज असूनही आपल्या संगीताच्या ठरवलेल्या मापदंडात त्यांनी तडजोड केली नाही. *मेरे मेहबूब*चे शीर्षकगीत तीनं वाद्यांवर रूजू करून त्यांनी वेगळा विक्रम निर्मिला. ए. आर. कारदार, विजयभाई-शंकरभाई भट्ट, एस. यु. सनी, मेहबूब खान व के. आसिफ यांच्याव्यतिरिक्त त्यांनी कुठे काम केले नाही.

शास्त्रीय संगीतातील धुरंधरांना चित्रपटात गायला लावण्याची सुरूवात नौशादनी केली. उस्ताद अमीर खां (शबाब, बैजू बावरा), उस्ताद बडे गुलामअली खां (मुगल-ए-आझम), डी. व्ही. पलुस्कर (बैजू बावरा) यांना चित्रपटात गायला आणले ते नौशादनीच. मात्र हे सगळे दिग्गज असूनही आपल्या संगीताच्या ठरवलेल्या मापदंडात नौशादनी तडजोड केली नाही.

स्वातंत्र्य मिळाल्यावर त्याची पहिलीवहिली कहर चित्रसंगीतात आली ती शंकर जयकिशन यांच्या संगीतातून. दक्षिण गुजरातच्या वासंदा नामक छोट्या गावातले जयकिशन पंचाल व हैदराबादचे शंकर या दोघांवर संगीताची पहिली जबाबदारी सोपवली ती राज कपूरनी. या दोघांनी *बरसात* चित्रपटापासून जे संगीताचे युग निर्माण केले ते आजच्या अनु मलिक व राम-लक्ष्मण या संगीतकारांनी अजूनही शंकर-जयकिशन आमचे आदर्श होते म्हणत जोपासलेय.

आर. के. बॅनरव्यतिरिक्तच्या चित्रपटातही या जोडीने चिरतरूण संगीत दिले. या चित्रपटांमध्ये शम्मी कपूर, राजेंद्रकुमार, देव आनंद हे हीरो असत. पण आर. के. बॅनरच्या चित्रपटात शंकर-जयकिशन यांचे संगीत सदाबहार ठरले. एकीकडे आर. के. बॅनर म्हणजे राज कपूर व शंकर-जयकिशन यांची टीम सदाबहार संगीत देत होती तर दुसरीकडे नवकेतन बॅनर म्हणजे देव आनंद व संगीतकार एस. डी. बर्मन ही टीम सदाबहार संगीत निर्माण करत होती.

मधुर संगीताच्या प्रकरणात एस. डी. बर्मन यांचे नाव विसरून चालणार नाही. लहानपणापासूनच तत्कालीन धुरंधर शास्त्रीय कलाकारांना जवळून ऐकत त्यांनी शास्त्रीय गायनाचा अभ्यास केला. शिवाय ईशान्य भारतातील लोकसंगीताचा सखोल अभ्यासही त्यांनी केला. त्यांनी चिरतरूण देव आनंद यांच्या चित्रपटांना सदाबहार संगीताने आणखी चिरतरूण केले. देव आनंदसाठी किशोरकुमारच्या आवाजाचा योग्य वापरही त्यांनीच केला.

एस. डी. बर्मन फक्त संगीतकार नव्हते. विशिष्ट आवाजाचे ते गायकही होते. त्यांनी गायलेल्या गाण्यांना चित्रपटसंगीतात एक असामान्य महत्त्व आहे. 'सुनो मेरे बंधू रे...' (*सुजाता*), 'वहां कौन है तेरा' (*गाईड*), 'सफल होगी तेरी आराधना' (*आराधना*) आणि 'तेरे नैना तलाश कर जिसे ढूंढे' (*तलाश*) सारखी गाणी आजही सूर्यकिरणाइतकीच स्वच्छ सुंदर नि ताजी वाटतात. सचिनदेव पारदर्शक स्वभावाचे होते. आपल्या मर्यादा ते जाणून होते. म्हणूनच देव आनंद *हरे राम हरे कृष्ण* चित्रपट बनवत असताना त्यांनी स्वतः ऐवजी आर. डी. बर्मनवर संगीत सोपवण्याचा सल्ला देव आनंदना दिला.


एस. डी. बर्मन यांच्याशी ताळमेळ जुळण्यापूर्वी देव आनंद यांनी इतर संगीतकारांशी संपर्क साधला होता. त्यात आजच्या जगविख्यात सरोदवादक उस्ताद अली अकबर खान यांचाही समावेश आहे. त्यांनी नवकेतनच्या *आंधीयां* चित्रपटाला संगीत दिलेले. तसेच सतारसम्राट पंडित रवीशंकर यांनी *अनुराधा* व *गोदान*सारख्या चित्रपटांना संगीत दिलेले. *अनुराधा*ची गाणी हिट ठरलेली. 'जाने कैसे अंखियो में खो गयी रतियां, सांवरे काहे मोंसे करो जोराजोरी' आणि 'हाय रे वो दिन कयुं न आये रे...' ह्या शेवटच्या गाण्याद्वारा कर्नाटकी संगीताचा कलावती राग प्रथमच

हिंदी चित्रपटात आला.

देव आनंद यांच्याकरता एक संस्मरणीय चित्रपट दिला जयदेव यांनी. *हम दोनो* या त्यांनी संगीत दिलेल्या चित्रपटाचे संगीत गाजले. जयदेव यांचा आणखी एक चित्रपट खूप गाजला तो म्हणजे सुनील दत्त-वहिदा अभिनित *मुझे जीने दो*. या चित्रपटावरोबर लता मंगेशकरांच्या आवाजातील 'अल्ला तेरो नाम' या गाण्याचे संगीतही जयदेवनीच दिले.

चित्रपट संगीताच्या सुवर्णयुगात आणखी एक मातब्बर नाव होते रोशन यांचे. त्यांचेही कितीतरी चित्रपट गाजले पण आपण फक्त नुसत्या सीमाचिन्ह ठरलेल्या चित्रपटांबाबतच बोलतोय. 'ना तो कारवां की तलाश है...' ही त्यांनी संगीतबद्ध केलेली कव्वाली आजही लोकप्रिय आहे. तसेच शास्त्रीय संगीतात तराना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गीत प्रकाराचा उपयोग त्यांनी *दिल ही तो है* चित्रपटात केलेला. मन्ना डे यांनी ते गाणे गायले होते व राज कपूर यांच्यावर ते चित्रीत झाले होते. ते गीत होते, 'लागा चुनरी में दाग छुपाऊं कैसे...' मुकेशसारख्या गायकाकडून रोशन यांनी अनेक लोकप्रिय गीते गाऊन घेतली. 'बहारोंने मेरा चमन लूटकर...'

भारतीय संगीताचे गाढे उपासक व कामाबाबत तडजोड न स्वीकारणारे खय्याम व जयदेव यांनी मोजकेच संगीत दिले पण त्यांनी संगीतबद्ध केलेले चित्रपट खास गाजले *फिर सुबह होगी*, *कभी कभी*, *नूरी*, *उमराव जान*, *रजिया सुलतान*, *आखरी खत* ही खय्याम यांच्या हिट चित्रपटांपैकीच काही नावे. पाश्चिमात्य संगीताची उत्तम जाण असूनही भारतीय संगीताच्या आधारावरच लोकप्रिय ठरलेले दुसरे संगीतकार मदनमोहन. मदनमोहन हे गजलांचे शहनशाह. त्यांच्या सदाबहार संगीतमय चित्रपटात *आशियाना*, *मदहोश*, *अदा*, *रेल्वे प्लॅटफॉर्म*, *मेरा साया*, *देख कबीरा रोया*, *अदालत*, *हकीकत*, *भाई भाई*, *जहाँ आरा*, *दुल्हन एक रात की* सारख्या चित्रपटांची नावे घ्यावी लागतील. गजलसम्राज्ञी बेगम अख्तर व ठुमरी सम्राज्ञी सिद्धेश्वरीदेवी देखील मदनमोहन यांची चाहती होती. मदनमोहन यांचे कडवे समीक्षकही कबूल करतात की, लताच्या आवाजाची खुबी कल्पकतेने कुणी वापरली असेल तर ती मदनमोहननीच. निपुण संगीतकारांमध्ये सी. रामचंद्र म्हणजेच रामचंद्र चितळकर यांचं नाव घ्यावं लागेल. कारकीर्दीच्या प्रारंभी सी. रामचंद्रनाही खूप संघर्ष करावा लागला. सोहराब मोदींच्या चित्रपटात त्यांनी एक्स्ट्रा म्हणून कामे केली. सी. रामचंद्र खरं तर हीरो बनायलाच इथे आलेले पण हीरो बनायची इच्छा पूर्ण न झाल्याने संगीतकार



खय्याम



एस. डी. बर्मन

बनले. गीतकार प्रदीपदेखील म्हणायचे की, अण्णा चितळकरांने इतर कुठलेही काम न पाहता त्यांनी संगीतबद्ध केलेले नुसते 'ऐ मेरे वतन के लोगों' जरी लक्षात घेतले तरी ते खूप मोठे संगीतकार ठरतात. गीतकार प्रदीप, अभिनेते-निर्माते भगवान व लता मंगेशकर यांच्याबरोबर सी. रामचंद्र यांचा उत्तम मेळ होता.

एस. डी. बर्मननी देव आनंदसाठी शंकर जयकिशनने राज कपूर यांच्यासाठी काम केले तसे वसंत देसाईंनी राजकमल बॅनर म्हणजे व्ही. शांतारामांसाठी व प्रकाश पिक्चर्सच्या विजयभाई भट्ट यांच्यासाठी काम केले. *तुफान और दिया*, *दो आँखे बारह हाथ*, *झनक झनक पायल बाजे*, *गूंज उठी शहनाई*, हृषिकेश मुखर्जींचा *गुड्डी*, अशोककुमार-हरिंद्रनाथ चट्टोपाध्याय यांच्या अभिनयाची जुगलबंदी असलेला *आशीर्वाद* सारख्या निवडक चित्रपटांनाच वसंत देसाईंनी संगीत दिले.

शंकर-जयकिशन यांच्या शैलीवर प्रभावित परंतु आपली स्वतःची एक अनोखी धारा धरणारे व प्रत्येक दशकातल्या यशस्वी कलाकारासाठी हिट गाणी देऊन शिखरावर असणारे कल्याणजी आनंदजी *नागीन* या चित्रपटात क्लेव्हायलिन वादक म्हणून चित्रसृष्टीत आले. हेमंतकुमार यांच्या संगीत दिग्दर्शनांतर्गत *नागीन*मधील त्यांची बीन अशी काही वाजली त्या बीनच्या तालावर नुसते प्रेक्षकच नाहीतर अनेक हिंदी निर्माते डोलू लागले. या बीननंतर स्वतःचे बंधू आनंदजी यांना जोडीला घेऊन स्वतंत्र संगीतकार म्हणून हिंदी चित्रसृष्टीत कामाला लागले. १९५०च्या दशकातील दिलीप-राज-देव या हिट त्रिकूटाचे अनेक चित्रपट १९६०च्या दशकात राजेंद्रकुमार, धर्मेंद्र, मनोजकुमार, राजेश खन्ना, १९७०च्या दशकात अमिताभ बच्चन या सुमार हिरोंचे चित्रपट त्यांनी संगीताने गाजवले. अख्खी सिनेसृष्टी ज्याच्या मागे पागल होती त्या किशोरकुमार व अमिताभ बच्चन या जोडीकडून कल्याणजी-आनंदजींनी बरेच काम करवून घेतले. एवढेच नव्हेतर आजच्या काळातले आघाडीचे गायक घडवण्यात देखील त्यांचा मोलाचा वाटा आहे. उदित नारायण, सपना मुखर्जी, पूर्णिमा,


साधना सरगम, अलका याज्ञिक सारख्या गायकांना कल्याणजी-आनंदजींनीच वर आणले.

भजने व भिक्षुकी गाण्याबद्दल बोलताना संगीतकार रवी यांचा उल्लेख टाळून चालणार नाही. १९५० च्या दशकात हेमंतकुमार यांचे सहाय्यक म्हणून काम करणाऱ्या रवींना देवेंद्र गोयल आणि बी. आर. चोप्रांनी पहिली संधी दिली. यानंतर दोन अडीच दशके रवी हिंदीत स्थान जमवून होते. त्यांचा पहिलावहिला *वचन* चित्रपट संगीतदृष्ट्या हिट ठरला. 'तुझ को रख्खे राम तुझ को अल्ला रख्खे...', 'मेरी सुन ले अरज बनवारी...', 'तू प्यार का सागर है...' यासारखी कितीतरी रवी यांची गाणी गाजली. रवी यांनी बी. आर. चोप्रांबरोबर *गुमराह*, *हमराज*, *वक्त*, *इन्साफ का तराजू*, *मजदूर* सारखे चित्रपट तर रामानंद सागर यांचा *आँखे*, देवेंद्र गोयल यांचा *एक फूल दो माली*, ओ. पी. रल्हन यांचा *फूल और पत्थर* असे कित्येक हिट चित्रपट त्यांनी दिले.



नौशाद

त्या काळात लताशिवाय सुपरहिट संगीत देऊन आपला डंका वाजवणारे संगीतकार होते ओ. पी. नय्यर. त्यांनी लताला पर्याय म्हणून शमशाद बेगम, गीता दत्त, आशा भोसले यांचा उपयोग करून सदाबहार संगीताचा आणखी एक प्रवाह ओ. पीं.नी आणला. श्यामसुंदर व गुलाम हैदर यांच्याप्रमाणे पाकिस्तानातील व पंजाबातील संगीताचा उत्तम वापर नय्यर यांनी आपल्या विशिष्ट लयी वापरून केला. गुरूदत्त यांनी *बाजी* व *आरपार*मध्ये त्यांना प्रथम संधी दिली आणि शम्मी कपूर, जॉय मुखर्जी, विश्वजित यांच्यासाठी ओ. पीं.नी उत्तम धून तयार करून पडद्यावर एक वेगळे चैतन्यच आणले.



लक्ष्मीकांत-प्यारेलाल

१९६०च्या दशकात दोन मातब्बर संगीतकार हिंदी चित्रपटात होते ते म्हणजे आर. डी. बर्मन व लक्ष्मीकांत-प्यारेलाल. आर. डी. खऱ्या अर्थाने जिनियस होते. कॉमेडियन मेहमूद यांच्या छोट्या-छोट्या चित्रपटांनी सुरूवात करून आर. डीं.नी स्पर्धेत उडी घेतली व त्याकाळच्या मातब्बर संगीतकारांमध्येही त्यांनी आपला एक वेगळा ठसा उमटवून दाखवला. *भूत बंगला*, *पडोसन*, *हरे राम हरे कृष्ण*, *अमरप्रेम* आणि गुलजार यांचे जवळजवळ सगळेच चित्रपट आर. डी. बर्मननी संगीतबद्ध केले. *आँधी*, *मौसम*, *परिचय*, *खुशबू*, *मासूम*, *किनारा*. पिता एस. डी. बर्मन यांच्याप्रमाणे आर. डीं.नीही आपली गाण्याची शैली विकसित केली होती. पित्याप्रमाणे त्यांचीही स्वतः गायलेली काही मोजकीच गाणी गाजली त्यात रमेश सिप्पी यांच्या सुपरडुपर हिट *शोले*तील 'मेहबूबा मेहबूबा...' आणि *शान*मधील 'यम्मा यम्मा...' गाणे खूप लोकप्रिय झाले.

याच काळातील आणखी एक दिग्गज संगीतकार होते लक्ष्मीकांत-प्यारेलाल. नौशाद, सी. रामचंद्र, एस. डी. बर्मन यांच्याकडे वादक म्हणून काम करणाऱ्या या दोन प्रतिभावान संगीतकारांना स्वरकिन्नरी लता मंगेशकरांचे जबरदस्त पाठबळ मिळाले. १९६३-६४ साली त्यांना पहिली संधी मिळाली ती *पारसमणी* चित्रपटात. यानंतर राजश्री प्रॉडक्शन्सचा छोट्या बजेटचा *दोस्ती* त्यांनी केला. मग मात्र त्यांची गाडी भरवेगाने धावू लागली. १९६३-६४ पासून काल-परवापर्यंत म्हणजे ३०-३१ वर्षात लक्ष्मी-प्यारेंनी दिलीपकुमार-देव आनंदपासून ते विवेक मुशरन पर्यंतच्या अनेक कलाकारांवर लोकप्रिय गाणी केली. या संगीतकारांनी संगीताबाबत बरेच प्रयोगही केले. मात्र गाण्याचे माधुर्य कुठेही कमी होऊ दिले नाही.

या सगळ्या चित्रसंगीत प्रपंचात बुलो सी रानी, स्नेहल भाटकर, राज कमल, सलील चौधरी, उषा खन्ना, चित्रगुप्त, रवींद्र जैन ही मंडळी देखील आपापल्या परीने महत्त्वाची कामगिरी करून गेली. आजच्या तरूण पिढीच्या संगीतकारांमध्ये आनंद-मिलिंद, नदीम-श्रवण, अनु मलिक, जतिन-ललित, दिलीप-समीर सेन व ए. आर. रहेमान ही मंडळी आपली वेगवेगळी प्रकरणे इतिहासात नोंदवत आहेत. ●